कृपया प्रसिध्दीसाठी - 16 फेब्रुवारी 2009

## आर्थिक संकटांवर मात करण्याची काँग्रेसकडे राजकीय इच्छाशक्ती नाही - राम नाईक

मुंबई, सोमवार : "आर्थिक मंदीवर मात करण्याचा कोणताही प्रयत्न किंवा इच्छाशक्ती काँग्रेसकडे नाहीच उलटपक्षी संसदीय संकेतांना पायदळी तुडविणारा अर्थसंकल्प श्री.प्रणव मुखर्जी यांनी सादर केला आहे," अशी टीका करीत असतानाच माजी पेट्रोलियम मंत्री श्री.राम नाईक यांनी अर्थसंकल्पाच्या दिवशी पेट्रोल, डिझेल व स्वयंपाकाच्या गॅसचे दर कमी करण्याऐवजी हवाई इंधन पुन्हा एकदा स्वस्त केल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

युपीए सरकारच्या अंतिम अर्थसंकल्पाबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना श्री.राम नाईक पुढे म्हणाले, "अंतरिम अर्थसंकल्पात नव्या घोषणा करायच्या नाहीत असा संकेत असतानाही आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून विधवांसाठी तसेच अपंगांसाठी इंदिरा गांधी निवृत्ती वेतन योजना जाहीर करुन संसदीय संकेत साफ पायदळी तुडविण्यात आले आहेत. दुसरीकडे अर्थसंकल्पाच्या दिवसापासूनच पुन्हा एकदा या सरकारने श्रीमंतांचे लागूंलचालन करण्यासाठी हवाई इंधन स्वस्त केले आहे. आता प्रति लीटर रु.29.98 ने हवाई इंधन मिळणार असून मोटार वाहनांना लागणा-या पेट्रोलपेक्षाही ते प्रति लीटर रु.14.57 ने स्वस्त आहे याचा करावा तेवढा निषेध कमीच आहे. आर्थिक संकटांवर मात करु शकू असा विश्वासच या सरकारला वाटत नसल्याने अर्थमंत्र्यांनी स्वत:च ती जबाबदारी नव्या सरकारला पेलावी लागेल असे म्हणणे दुर्दैवी आहे. गेल्या अर्थसंकल्पाच्यावेळी राष्ट्रीय विकास दर

अयशस्वी झाले आहे. विकास दर जेमतेम 7.1 पर्यत असल्याचे त्यांनी कबूल केले. त्याचप्रमाणे घाऊक मूल्यांवर आधारित महागाई निर्देशांक 4.4 टक्के कमी झाला आहे असे अर्थमंत्री म्हणाले असले तरी प्रत्यक्षात जीवनावश्यक वस्तूंचे किरकोळ विक्रीचे दर कमी झालेले नसून महागाई वाढली असल्याचे स्पष्ट दिसते आहे."

"निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मंदीच्या काळातही आकर्षक चित्र दाखवायचा अर्थमंत्र्यांचा प्रयत्न सपशेल फसला आहे," असेही श्री.नाईक म्हणाले.

(कार्यालय सचिव)